# प्रकरण ५ वे

# उपसंहार

# प्रकरण ५ वे
# उपसंहार

प्रस्तुत चार प्रकरणातून 'गौरवग्रंथांचा विवेचक अभ्यास' (गंगाधर पानतावणे व रत्नाकर मंचरकर यांच्यावरील गौरवग्रंथाधारे) मांडलेला आहे. तो अधिकाधिक अभ्यासपूर्ण, वस्तुनिष्ठ व व्यापक कसा होईल याचा प्रयत्न केलेला आहे. हा अभ्यास करीत असताना प्राप्त झालेल्या निष्कर्षाची पुनर्मांडणी प्रस्तुत प्रकरणात केलेली आहे.

'गौरवग्रंथ : प्रेरणा - स्वरूप - परंपरा' या पहिल्या प्रकरणातून 'गौरवग्रंथ' संकल्पनेचा वेध घेतलेला आहे. गौरवार्थ व्यक्तीचा अभ्यास विषय केंद्रस्थानी ठेऊन विशिष्ट विषयांवर लिहून घेतलेल्या समीक्षात्मक लेखांच्या संग्रह स्वरूपात गौरवग्रंथ सिद्ध झालेले आहेत. एखाद्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू आणि त्यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा तसेच समीक्षादृष्ट्या विविध अंगोपांगाचा एकाच वेळी वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपात विचार आलेला आहे. प्रामुख्याने हे गौरवग्रंथ संपादन स्वरूपात आहेत. संपादित स्वरूपात असणाऱ्या गौरवग्रंथांच्या माध्यमातून मराठी साहित्य व समीक्षेचे विद्यमान दर्शन घडते. एक 'माणूस' आणि 'कलावंत' या दोन वेगवेगळ्या पातळ्यांवर होणारे जीवनदर्शन या ग्रंथांमधून आलेले आहे.

'ऋणातून उतराई होणे' आणि यथोचित गौरव या दोन प्रमुख प्रेरणांच्या बळावरच गौरवग्रंथांची निर्मिती झालेली आहे. बहुतेक गौरवग्रंथ हे अध्ययन आणि अध्यापन क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींच्या जीवनावर सिद्ध झालेले आहेत. स्वत: अखंड विद्यार्थी आणि अध्यापक म्हणून कार्य करणाऱ्या गुरूचा निरपेक्ष गौरव करून एक नवा संदर्भ ग्रंथ म्हणून गौरवग्रंथ संकल्पना उदयाला आलेली आहे. हेच दिसून येते. व्यापक व विशाल साहित्यक्षेत्रामध्ये एखाद्या व्यक्तीचे असणारे विशिष्टत्व प्रस्तुत ग्रंथांमधून दिसून येते. गौरवमूर्तीच्या विशिष्ट वयाच्या टप्प्यावर सद्भाव व्यक्त करणाऱ्याच्या माध्यमातून हे ग्रंथ सिद्ध झाल्याचे दिसून येतात. गौरवग्रंथांचे स्वरूप मूलत: आस्वादक आणि विवेचक स्वरूपाचे आहे. एकाचवेळी अनेकविध विषयांना समीक्षात्मकदृष्ट्या न्याय देण्याचा प्रयत्न प्रस्तुत ग्रंथांमधून झालेला आहे. या गौरवग्रंथांची मराठी वाङ्मयामध्ये दीर्घ परंपरा नसली तरी वैशिष्ट्यपूर्ण नक्कीच आहे, हे दिसून येते.

मराठी साहित्य व समीक्षेतील निवडक वाङ्मय उपासकांच्या प्रज्ञा व प्रतिभा यांच्या गौरवाच्या माध्यमातून एक नवे अभ्यासक्षेत्र गौरवग्रंथांच्या माध्यमातून निर्माण झालेले आहे. साहित्य, समाज आणि संशोधन या वाङ्मयीन परिक्षेत्रांचे प्रतिबिंब गौरवग्रंथात दिसते.

'साहित्य, समाज आणि संस्कृती' स्वरूप आणि विश्लेषण या दुसऱ्या प्रकरणातून गंगाधर पानतावणे यांच्या व्यक्तिगत जीवनाबरोबरच त्यांच्या समग्र वाङ्मयीन कर्तृत्वाचा मागोवा आलेला आहे. मित्र-सन्मित्र, शिक्षक-मार्गदर्शक, संपादक-लेखक, समीक्षक-विचारवंत म्हणून गंगाधर पानतावणे यांच्या

व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलघडले आहेत. गंगाधर पानतावणे यांनी अस्मितादर्शच्या रूपाने दलित वाङ्मयामध्ये वैचारिक प्रबोधनाची जी नवी पायवाट निर्माण केलेली आहे व त्यातूनच दलित साहित्य चळवळीला एक व्यापक परिणाम लाभले याचाच आलेख आलेला आहे.

गंगाधर पानतावणे यांचे व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्व याचबरोबर त्यांनी ज्या ज्ञानक्षेत्रात कार्य केलेले आहे त्याबद्दल विविध समीक्षक आणि विचारवंत यांचे साहित्य, समाज आणि संस्कृतीबद्दल समीक्षात्मक लेख आलेले आहेत. निमित्ताने केलेले हे लेखन मराठी समीक्षेला व एकूण सामाजिक वाटचालीस पूरक ठरणारे आहे. साहित्य, समाज आणि संस्कृती इ. बद्दलच्या विविध घटकांच्या मौलिक चिंतनातून नवार्थदर्शन स्पष्ट झालेले आहे. धर्म, वर्ग, वर्ण्य, शिक्षण, कला, साहित्य यांच्या वैचारिक चिंतनातून सांस्कृतिक मंथन प्रकट झालेले आहे. गंगाधर पानतावणे यांच्या वैचारिक चिंतनातून साठोत्तरी साहित्यप्रवाहातील दलित-ग्रामीण प्रवाहांचे लक्षणीय चिंतन आलेले आहे. दलित साहित्यातील अभिजनवाद, फुले-आंबेडकर यांचे विचार, दलित साहित्याचे निराळेपण, सेक्युलर राज्य व बुद्ध धर्म इ. बद्दलचा समग्र मागोवा आलेला आहे.

गौरवग्रंथांच्या 'विचार' या भागातून पानतावणे यांच्या आंबेडकरनिष्ठ विचारांचा आढावा आलेला आहे. पानतावणे सरांचे कोणत्याही विषयावरील विचार हे आपण आंबेडकरवादी सांस्कृतिक प्रणालीचे भाष्यकार आहोत, याच भूमिकेतून आलेले आहेत. गंगाधर पानतावणे यांचा साहित्य विचार त्यांच्या जीवनाचाच एक अविभाज्य भाग आहे; हेच दिसून येते.

'साहित्याचा अभ्यास' या तिसऱ्या प्रकरणातून मराठी साहित्याचे अभ्यासक र. बा. मंचरकर यांच्या व्यक्तिगत जीवन व वाङ्मयीन कर्तृत्वाबरोबरच साहित्याच्या अभ्यासविषयक विविध घटकांचा समीक्षात्मक मागोवा आलेला आहे. साहित्याच्या अभ्यासाचा मागोवा आणि अभ्यासाचे क्षेत्र यांचे परस्परसंबंध आलेले आहेत. महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच एम.फिल., पीएच. डी. चे संशोधक इ. सर्वांनाच साहित्यकृती, साहित्यप्रकार, वाङ्मयीन कालखंड, प्रबंध लेखन इ. साठी जो अभ्यास करावा लागतो त्याचाच समीक्षात्मक परामर्श गौरवग्रंथातून आलेला आहे. साहित्याचा अभ्यास करण्यासाठी आस्वादन, वर्णन-विश्लेषण, तुलना, वर्गीकरण इ. चा वापर करावा लागतो. त्याचप्रमाणे आकलन, मूल्यमापन, शब्दांकन इ. प्रक्रियांचा वापर करावा लागतो हेच साहित्याच्या अभ्यासातून दिसून येते. साहित्याच्या अभ्यासाने घडून येणारे सर्जनशील कार्य प्रकट झालेले आहे. अभ्यास व समीक्षा एकच मानून या पातळीवर साहित्याचा अभ्यास आलेला आहे.

साहित्यकृती, साहित्यप्रकार, लेखक व कालखंड ही अभ्यासाची साखळी आणि सर्व अभ्यासप्रकारांचे क्रमशः विवेचन आलेले आहे. साहित्यकृतीच्या अभ्यासात वस्तुनिष्ठ अर्थनिर्णयन, तिचे कार्य, ते करण्याची पद्धती इ. विचार मांडलेला आहे. साहित्यकृतीच्या संदर्भात निकष व मूल्ये यांचा आगळा-वेगळा विचार मांडलेला आहे. उदा. कांदबरी 'एन्कीच्या राज्यात' च्या संदर्भात सौंदर्यमूल्यांहून

अधिक महत्त्व जीवनमूल्यांना दिलेले आहे. लेखकाच्या अभ्यासात लेखकाची संवेदनशीलता, अभिरूची, पिंडधर्म आणि परिप्रेक्ष्य यांच्यावर भर दिलेला आहे. विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासात युगधर्म आणि साहित्य यांच्यातील नात्याचा वेध घेतलेला आहे.

साहित्याच्या अभ्यासाची ही अंगे परस्परांशी निगडीत आहेत व परस्परांशी पूरक आहेत हेच दिसून येते. साहित्याच्या अभ्यासाला सैद्धांतिक परिणाम लाभल्यामुळेच साहित्य अभ्यासाला संशोधनाचे स्वरूप प्राप्त झालेले आहे. वर्गमित्र एन. एम. आव्हाड, एकनाथ ढोणे, सौ. अनुराधा बंगाळ यांच्या लेखामधून र. बा. मंचरकर यांच्या सामाजिक - सांस्कृतिक जीवनाचे पैलू उलघडले आहेत. गौरवग्रंथाच्या या भागातून मंचरकर यांचे व्यक्तिविशेष दिसून येतात.

साहित्याचा अभ्यास हा र. बा. मंचरकर यांच्यावरील गौरवग्रंथ महाविद्यालयीन विद्यार्थ्यापासून पीएच.डी.पर्यंत संशोधन करणाऱ्या अभ्यासकांना मार्गदर्शन करणारा आहे. समीक्षेच्या दृष्टिकोणातून अध्ययन-अध्यापन, लेखन इ. क्षेत्रामध्ये प्रवेश करू इच्छिणाऱ्या अभ्यासकांसाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ आहे.

'समीक्षामूल्यदृष्ट्या गौरवग्रंथांचा विचार' या चौथ्या प्रकरणातून समीक्षेच्या दृष्टिकोणातून या दोन्ही गौरवग्रंथांची मौलिकता प्रकट झालेली आहे. 'साहित्य, समाज आणि संस्कृती' आणि 'साहित्याचा अभ्यास' हे दोन्ही गौरवग्रंथ समीक्षादृष्ट्या वैविध्यपूर्ण आहेत. समीक्षेतील बहुविध विषयांचा एकाचवेळी दोन्ही गौरवग्रंथातून अभ्यास आलेला आहे. दोन्ही गौरवग्रंथांधारे गुरूविषयीचा सद्भाव व्यक्त झाल्याने या ग्रंथांना एक व्यापक स्वरूपाचे संदर्भमूल्य निर्माण झालेले आहे.

'साहित्याचा अभ्यास' या गौरवग्रंथामधून साहित्याच्या अभ्यासाची वैचारिक बैठक स्पष्ट झालेली आहे. 'साहित्य, समाज आणि संस्कृती' या गौरवग्रंथामधून साहित्य, समाज आणि संस्कृती विषयक विविध घटकांचे मौलिक चिंतन आलेले आहे.

एकूणच पाहता - गौरवग्रंथ हा ग्रंथप्रकार स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये उदयाला आलेला आहे, हेच दिसून येते. यांची संख्या अत्यल्प असली तरी त्यातील गौरवाची भावना लक्षात घेऊन विशेष क्षेत्राला गवसणी घालणाऱ्या अभ्यासकांच्या विस्तृत वाङ्मयीन कर्तृत्वाचा पट उलघडून दाखविलेला आहे, हेच दिसून येते. त्याचप्रमाणे समीक्षाविषयक विविध अंगोपांगांचा यात स्वतंत्रपणे विचार मांडलेला असतो. या दोन्हींची परस्पर सांगड घालून बहुआयामी व्यक्तिमत्त्वाच्या अभ्यासकाला या ग्रंथांच्या माध्यमातून खरीखुरी गौरवांजली समर्पित केलेली असते, हेच दिसून येते. मराठी वाङ्मयामध्ये समीक्षेच्या अभ्यासाची एक शिस्तबद्ध परंपरा गौरवग्रंथाच्या माध्यमातून निर्माण झालेली आहे, हेच दिसून येते.

-----x -----